MHSO130002272016

नियमित दिवाणी दावा क्र.१७९/२०१६
आण्णा शेळके
वि.
मोहन शेळके वगैरे

## निशाणी क्र.१९ वर आदेश

वादीचे अर्जातील कथन की, वादी यांनी ज्या मिळकतीबाबत प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वाटप मागितले आहे त्याच मिळकतीबाबत प्रतिवादी यांनी न्यायालयामध्ये रेमुनं.९६/२०२१ हा वाटपाचा दावा दाखल केलेला आहे. दोन्ही दाव्यातील मिळकती व वादी प्रतिवादी हे एकच आहेत. सबब, दोन्ही प्रकरणे एकत्र चालविण्याबाबत कोर्टाचे आदेश होणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे देऊन दोन्ही दावे एकत्र चालविण्याबाबत त्यांची हरकत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या रेमुनं.९६/२०२१ ची निशाणी क्र.१ ची प्रत बघितली. वादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा दावा तसेच प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या वादींविरुध्द दाखल केलेला रेमुनं.९६/२०२१ चा दावा यातील दावा मिळकत एक असुन वादी व प्रतिवादी यांनी एकमेकांविरुध्द वाटपासाठी प्रस्तुतचे दावे दाखल केले आहे. अशा परिस्थितीमध्ये दावा गुणदोषावर निकाली निघण्यासाठी तसेच वस्तुस्थिती समोर येण्यासाठी दोन्ही दाव्यांच्या संदर्भातील गुंतागुंत टाळण्यासाठी दोन्ही दावे एकत्र चालविणे याठिकाणी गरजेचे आहे. सबब, वादीचा अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

### आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. रेमुनं.९६/२०२१ व रेमुनं.१७९/२०१६ हे दोन्ही दावे एकत्र चालविण्यात येत आहेत.

PADMASHRI VASANT RAUT

Digitally signed by PADMASHRI VASANT RAUT
Date: 2026.02.24 18:07:02 +0530

बार्शी.
दिनांक २४/०२/२०२६

( श्रीमती पी.व्ही. राऊत )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बार्शी.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule |
| (b) | Court | : | Smt. P.V. Raut,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 24/02/2026 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24/02/2026 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 24/02/2026 |